राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना सन २०१७-१८
<u>या आर्थिक वर्षाकरीता अनुदानाचे वाटप.</u>

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : राकुला-२०१२/प्र.क्र.८४२/विसयो
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७ मार्च, २०१८

<u>वाचा :-</u>
१) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. मकोनि-१०१०/प्र.क्र.३२/कोषा प्र-५, दि.१५/०४/२०१०
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थस-२०१७/७५./अर्थसंकल्प-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७.
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समक्रमांक, दिनांक - २० जून, २०१७.

<u>शासन निर्णय :</u>

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेच्या अंमलबजावणीसाठी रु.६०,००,००,०००/- एवढी अर्थसंकल्पिय तरतूद मंजूर झालेली आहे. संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेसाठी रुपये २७,४२,८०,०००/- (रुपये सत्तावीस कोटी बेचाळीस लक्ष ऐंशी हजार फक्त) एवढी तरतूद वितरीत करण्यात आलेली आहे.

२. राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेसाठी रुपये १४,५७,१६,०००/- (रुपये चौदा कोटी सत्तावण लक्ष, सोळा हजार फक्त) इतकी तरतूद माहे ऑक्टोबर, २०१७ ते डिसेंबर, २०१७ या कालावधीच्या खर्चासाठी वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच मासिक विवरण पत्रानुसार निधी **एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८** या कालावधी मध्ये पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणालीवर देण्यात आलेली आहे.

३. सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांनी यासोबत जोडलेल्या विवरणपत्राद्वारे वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या जिल्हयातील तालुक्यांना आवश्यकतेनुसार करावे. सदरचे अनुदान वितरण उपलब्ध निधीच्या आधारे करण्यात आले आहे. लाभार्थ्यांना अनुज्ञेय असलेले अनुदान बँक खाते / पोस्ट बचत खाते (पोस्ट ऑफिस सेव्हिंग खाते) यामार्फतच वितरीत करण्यात यावे. तसेच खर्च कोणत्याही परिस्थितीत सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. तसेच संदर्भ क्र.१ येथील परिपत्रकानुसार उणे पद्धतीने प्राधिकार पत्र काढण्यास मुभा आहे.

४. सदर निधीमधून झालेला खर्च "मागणी क्रमांक एन-३ मुख्य लेखाशीर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण, १०४-वृध्द विकलांग व निराश्रीत व्यक्तींचे कल्याण (०८)(०५) राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना-दारिद्रय रेषेखालील कुटुंबाला अर्थसहाय्य (केंद्र पुरस्कृत योजना) (२२३५ ३००५) ५०-इतर खर्च या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

५. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास

पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

६. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२७/२०१८/व्यय-१४ दि.१६/०२/२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक २०१८०३१९१६३९३३०७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.03.19 16:44:47 +05'30'

(अनिल कों. अहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद
२. सर्व जिल्हाधिकारी.
३. संचालक ,लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७. वित्त विभाग, अर्थसंकल्प ७, मंत्रालय, मुंबई-३२
८. उप सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. कक्ष अधिकारी (विसयो-२), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती, विसयो.

ANNEXTURE

Accompinement of Government Resolution No.RKY-2012/C.R.842/ Visayo-1,

Dated:- 17 March, 2018

Centrally Sponsored National Family Benefit Scheme (Rs in Thousand)

Sr.no	District	Oct-17	Nov-17	Dec-17	Total Amount Released Vide this order 6=(3+4+5)
1	**2**	**3**	**4**	**5**	**6**
1	Mumbai	50	50	50	150
2	Mumbai Suburban	50	50	50	150
3	Thane	1428	1428	1400	4256
4	Raigad	1428	1428	1428	4284
5	Ratnagiri	1428	1428	1400	4256
6	Sindhudurg	1428	1428	1428	4284
7	Palghar	1428	1428	1428	4284
	Kokan	**7240**	**7240**	**7184**	**21664**
8	Nashik	1428	1428	1400	4256
9	Dhule	1428	1428	1400	4256
10	Jalgaon	1428	1428	1428	4284
11	Ahmednagar	1428	1428	1428	4284
12	Nandurbar	1428	1428	1428	4284
	Nashik	**7140**	**7140**	**7084**	**21364**
13	Pune	1428	1428	1400	4256
14	Solapur	1428	1428	1400	4256
15	Satara	1428	1428	1428	4284
16	Sangali	1428	1428	1428	4284
17	Kolhapur	1428	1428	1428	4284
	Pune	**7140**	**7140**	**7084**	**21364**
18	Nagpur	1428	1428	1400	4256
19	Wardha	1428	1428	1428	4284
20	Chandrapur	1428	1428	1428	4284
21	Bhandara	1428	1428	1428	4284
22	Gadchiroli	1428	1428	1428	4284
23	Gondia	1428	1428	1428	4284
	Nagpur	**8568**	**8568**	**8540**	**25676**
24	Amaravati	1428	1428	1400	4256
25	Akola	1428	1428	1428	4284
26	Yavatmal	1428	1428	1428	4284
27	Buldhana	1428	1428	1428	4284
28	Washim	1428	1428	1428	4284
	Amaravati	**7140**	**7140**	**7112**	**21392**
29	Aurangabad	1428	1428	1428	4284
30	Beed	1428	1428	1428	4284
31	Nanded	1428	1428	1428	4284
32	Parbhani	1428	1428	1428	4284
33	Osmanabad	1428	1428	1428	4284
34	Jalana	1428	1428	1412	4268
35	Latur	1428	1428	1428	4284
36	Hingoli	1428	1428	1428	4284
	Aurangabad	**11424**	**11424**	**11408**	**34256**
	Grand Total	**48652**	**48652**	**48412**	**145716**